|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
उमवि नगर, जळगाव-४२५००१ फोन: ०२५७-२२५७२७६, २२५७२७७फॅक्स: ०२५७-२२५८४०३, ४०६,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र. कबचौउमवि/१८/ ११८ /२०२५ महत्वाचे दिनांक: ०५ /०२/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/प्राचार्या,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
कला,विज्ञान,विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये
जळगाव, धुळे आणि नंदूरबार

विषय - उन्नत अभिवृद्धी योजनेतंर्गत (CAS) Academic Level 10 to 11 and Academic Level 11 to 12 मध्ये जाण्यासाठी सन २०२५ मध्ये दरवर्षी आयोजित होणाऱ्या शिबिराच्या आयोजनाबाबत.

सन २०२५ या वर्षासाठी आयोजक महाविद्यालय म्हणून सहमती कळविलेल्या महाविद्यालयांबाबत

महोदय/महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य महाविद्यालयातील उन्नत अभिवृद्धी योजनेतर्गत (CAS) पदोन्नतीसाठी स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) जाण्याकरीता पात्र अध्यापकांच्या प्रस्तावांची छाननी तथा मूल्यमापनासाठी जळगाव,धुळे आणि नंदूरबार जिल्हानिहाय शिबिर वर्षातून दोन वेळेस आयोजित केले जाते.

तथापि, सदरहू शिबीर वर्षातून तीन वेळेस अर्थात चार महिन्यातून एकदा आयोजित करावे अशी विंनती विविध प्राधिकरण सदस्यांनी वेळोवेळी मा. कुलगुरु महोदयांकडे केलेली होती. मा. कुलगुरु महोदयांनी उपरोक्त विनंतीचा विचार करता वर्षातून तीन वेळेस सदरहू शिबीर आयोजन करण्यासाठी सहमती दर्शविलेली आहे.

त्यानूसार आयोजक महाविद्यालय म्हणून विद्यापीठाने परिपत्रक निर्गमित केले गेले. त्यानुसार पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित, पंकज महाविद्यालय, चोपडा यांनी वार्षिक शिबिर आयोजनासाठी जळगाव जिल्हाकरीता सहमती दर्शविली. तथापि धुळे आणि नंदूरबार जिल्ह्याकरीता कुठल्याही महाविद्यालयाने आयोजक महाविद्यालय म्हणून सहमती दर्शविलेली नव्हती.

त्याअनुषंगाने प्राप्त आदेशान्वये पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित, पंकज महाविद्यालय, चोपडा यांना वार्षिक शिबिर आयोजनासाठी जळगाव जिल्हाकरीता आयोजक महाविद्यालय म्हणून निश्चित करण्यात आलेले आहे. त्याच बरोबर धुळे आणि नंदूरबार जिल्ह्याकरीता कोणताही प्रस्ताव आला नसल्याने चोपडा हे शहर धुळे आणि नंदूरबार जिल्ह्याच्या जवळ असल्याने धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यासाठी सुद्धा पंकज महाविद्यालयास संधी देण्यात आलेली आहे.

... २

staffapp\ext.let.25\PN.22

## CAS- Academic Level 10 to 11 and 11 to 12

## सन २०२५ साठी उन्नत अभिवृद्धी योजना शिबिर आयोजनाचे वार्षिक वेळापत्रक

| क्र. | कालावधी | प्रस्ताव दाखल करण्यासाठी पदोन्नतीसाठी पात्र दिनांक | प्रत्यक्ष शिबिर आयोजन करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | जानेवारी ते एप्रिल | १ जानेवारी ते १५ एप्रिल पर्यंत | एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवडयात |
| ०२ | मे ते ऑगस्ट | १ मे ते १५ ऑगस्ट पर्यंत | ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवडयात |
| ०३ | सप्टेंबर ते डिसेंबर | १ सप्टेंबर ते १५ डिसेबर पर्यंत | डिसेबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात |

उपरोक्त वेळापत्रक हे सन २०२५ साठी निर्धारित केल्याप्रमाणे असेल. स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) पंकज महाविद्यालय, चोपडा यांना सन २०२५ करीता जळगाव, धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यासाठी आयोजक महाविद्यालय म्हणून निश्चित करण्यात आलेले आहे. सन २०२५ या एका वर्षातील तीन शिबिरे घेता येईल. पंकज महाविद्यालय, चोपड यांनी सन २०२५ या वर्षातील तीनही टप्प्यांची संपूर्ण प्रक्रिया राबविणे आवश्यक राहील.

तरी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तीनही जिल्ह्यातील महाविद्यालयानी पंकज महाविद्यालय, चोपडा यांचेकडे प्रस्ताव पाठविवावे. विद्यापीठाकडे प्रस्ताव पाठवू नयेत. कृपया सदरहू पत्र माहविद्यालयांच्या अध्यापकांच्या निदर्शनास आणून द्यावे व सदरहू पत्र नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात यावे ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू

उपकुलसचिव
(व्याख्याता मान्यता विभाग)

प्रत :
मा. प्राचार्य, पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित, पंकज महाविद्यालय, चोपडा

प्रत माहितीस्तव:
1) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव
2) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि,जळगांव
3) मा.उपकुलसचिव, मा.कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगांव
4) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगांव
5) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि,जळगांव